## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– श्रीशैल अरविंद रावण
**वय** :– ५३ वर्षे, **धंदा** :– नोकरी
**राहणार** :– ९०१, अनुसया रेसिडन्सी, सुसरोड, पाषाण, पुणे – ४११०२१

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री बी.डी.काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** माझे मुळगाव दिघंची आहे. दिघंची येथे माझ्या वडिलांची आणि काकांची जमिन आहे. जमिनीचा गट क्र. ७६१ ते ७६४, ७६६ असे असून एकूण जमिन ६ एकर २८ गुंठे आहे. सदर जमिन माझे वडील आणि काका यांच्यामध्ये सामाईक आहे. सदर जमिनीपैकी २८ गुंठे जमिन ही माझे वडील व काका यांनी खंडोबाच्या मंदीरासाठी तोंडी बोलीवर दिलेली आहे. उर्वरित ६ एकर जमिन ही यश मोरे यांच्यासोबत दिनांक १८/१०/२०२२ रोजी साठेखत झाले व त्याप्रमाणे ४ महिन्यामध्ये मोजणी करुन त्याचा ताबा यश मोरे यांना देवून व्यवहार पूर्ण करायचा असे ठरले होते. सदर व्यवहार १,१७,००,०००/– (एक कोटी सतरा लाख रुपये) रुपयांना ठरला होता. त्यापैकी इसारापोटी रक्कम रु.५,००,०००/– माझ्या वडिलांना व काकांना दिली होती.

**०२.** दिनांक ०३/१२/२०२२ रोजी मी आणि माझे काका यश मोरे यांच्यासोबत शेतामध्ये मोजणीविषयी आणि रस्त्याविषयी बोलणी करण्यासाठी दुपारी १२.३० वाजता गेलो होतो. तेथे गेल्यावर आम्हाला त्याठिकाणी जेसीबी चालू असेलेला दिसला. करंज, लिंबाची, निलगीरी अशी बरीच जुनी अंदाजे ४० ते ५० वर्षापासूनची १५ ते २० झाडे जेसीबीने तोडली होती. त्यानंतर बांधबंदिस्त जेसीबीच्या सहाय्याने उध्वस्त केला होता. माझ्या वडिल व काकांचे शेतामध्ये

असलेले सामाईक घर जेसीबीच्या सहाय्याने पाडले होते. कोणताही कब्जा दिला नसताना यश मोरे यांनी आमच्या मिळकतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत आम्ही आरोपीला विचारणा केली असता, त्याने दमदाटीची भाषा केली. त्यामुळे आम्ही आटपाडी पोलीस ठाण्यात जावून प्रथम खबरी अहवाल नोंदविण्याचा प्रयत्न केला. परंतू आरोपी यश मोरे यांचे असेलेले राजकीय पाठबळामुळे आमचा प्रथम खबर नोंदवून घेतली नाही. ही बाब गावामध्ये सांगू लागले की,''आमचे कोणी वाकडे करु शकत नाही''. त्यामुळे आम्हाला भिती वाटू लागली व माझ्या कुटूंबाला धोका निर्माण झाला. यश मोरेंनी जे काही केले ते पैशाने न भरुन निघणारे नुकसान आहे. यश मोरे यांनी कब्जा घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे दिनांक १८/१०/२०२२ रोजी केलेला करार सुध्दा मोडला आहे. आम्ही त्यांना कधीही कब्जा दिला नव्हता. त्यानंतर आम्ही न्यायालयात तक्रार दाखल करुन प्रथम खबर नोंदविण्याची मागणी केली.

**०३.** आता मला वर्दीजबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येते. छापील प्रथम खबरी अहवालावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास काही कागदपत्रे दाखवून शाबीत करण्याच्या कारणावरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.25 16:00:28 +0530

दि.२५/०३/२०२६　　　　　　　( आर. बी. कुलकर्णी )
आटपाडी.　　　　　　　सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी